संक्षिप्त वृत्त

तीनशे गावांत पाणीटंचाई; साडेतीन लाख ग्रामस्थांची होरपळ

बुलढाणा : जिल्ह्यात मे अखेरीस पाणी टंचाईची दाहकता वाढली असून तब्बल साडेतीन लाख ग्रामस्थांची पाण्याअभावी होरपळ सुरू आहे. लोकसभेच्या धामधुमीत पाणी टंचाईने जिल्हावासी व जिल्हा प्रशासन यांची कठोर परीक्षा घेतली. मे अखेरीस पाणी टंचाईची दाहकता वाढली. २९० गावांत पाणी नाही. ६७ गावांतील तब्बल २ लाख १८ हजार २५२ ग्रामस्थांना तहान व दैनंदिन गरजा भागविण्यासाठी केवळ टँकरचाच आधार आहे. यामध्ये बुलढाणा तालुक्यातील १५ , चिखली व देऊळगाव राजा मधील प्रत्येकी १४, मेहकर मधील १३, मोताळा मधील ६ सिंदखेडराजा मधील ३ तर लोणार तालुक्यातील २ गावांचा समावेश आहे. या गावांना ७१ टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. दुसरीकडे २२३ गावातील गावकऱ्यांची तहान २५९ अधिग्रहित खाजगी विहिरींद्वारे भागविली जात आहे. मेहकर तालुक्यातील ५० गावांसाठी ५७ , देऊळगाव राजा मधील २८ गावांना ५२, शेगावमधील ७ गावांना ७, मोताळातील १८ गावांना १८, चिखलीतील ४६ गावांना ५३, बुलढाणातील २३ गावांना २५ सिंदखेडराजा मधील ३४ गावांना ३४,लोणार तालुक्यातील १७ गावांना १९ खाजगी अधिग्रहित विहिरीद्वारे पाणी पुरविण्यात येत आहे. या गावातील सुमारे १ लाख ३० ग्रामीण नागरिकांची तहान यातून भागविली जात आहे.जिल्ह्यातील ५१ लहान मोठया सिंचन प्रकल्पात आता नाममात्र जलसाठा उपलब्ध आहे. पेन टाकळी, खडकपूर्णा आणि नळगंगा या तीन मोठ्या धरणात मिळून सरासरी ११.१८ टक्केच जलसाठा आहे. खडकपूर्णामध्ये केवळ मृत जलसाठाच आहे. मस, मन, पलढग, कोराडी, तोरणा, उतावळी, ज्ञानगंगा या सात मध्यम प्रकल्पात मिळून २८.२६ टक्केच जलसाठा उरला आहे. ३७ लघु प्रकल्प व ४ कोल्हापूर बंधाऱ्यात जेमतेम १३.०७ टक्के जलसाठा आहे.

निकालानंतर राष्ट्रपतींकडून मंत्रिमंडळाला जेवणाचे आमंत्रण

नवी दिल्ली : देशात शनिवारी लोकसभा निवडणुकीचे सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातील मतदान पार पडत आहे. यानंतर देशातील जनतेला वेध लागले आहे ते ०४ जूनचे. कारण ०४ जूनला म्हणजेच मंगळवारी लोकसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. पण या निकालाच्या दुसऱ्या दिवशीच म्हणजेच बुधवारी, ०५ जूनला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून डिनरचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून ०५ जूनला केंद्रीय मंत्रिमंडळाला फेअरवेल डिनर देण्यात येणार आहे. लोकसभा २०२४ रणधुमाळी सुमारे अडीच महिने सुरू होती. लोकशाहीच्या या सर्वात मोठ्या उत्सवात सत्ताधाऱ्यांनी आणि विरोधकांनी मिळून जोरदार प्रचार केला. सत्ताधारी-विरोधकांकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपाच्या जोरदार फैरी झाडण्यात आल्या आहेत. अनेक ठिकाणी मतदान केंद्रांवर गोंधळ घालण्याचे, ताब्यात घेण्याचे प्रकार घडले आहेत. याच्या तक्रारी देखील निवडणूक आयोगाकडे झालेल्या आहेत.प्रत्येक लोकसभेच्या कार्यकाळाच्या समाप्तीनंतर राष्ट्रपतींकडून मंत्रिमंडळाचा निरोप समारंभ आयोजित करण्यात येतो. यावेळी बुधवारी ०५ जूनला याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे १७ व्या लोकसभेतील संपूर्ण मंत्रिमंडळातील मंत्री या डिनर पार्टीला उपस्थित राहणार आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे यंदा लोकसभा निवडणूक लवकर पार पडल्याने १६ जूनला १७ व्या लोकसभेचा कार्यकाळ संपत असतानाही त्याआधी नवे सरकार स्थापन होण्याची शक्यता आहे

दूषित पाण्यामुळे ४९ ग्रामस्थांची प्रकृती बिघडली

अकोला : जिल्ह्याच्या तेल्हारा तालुक्यातील बेलखेड गावात दूषित पाण्यामुळे ४९ ग्रामस्थांची प्रकृती गेल्या काही दिवसांमध्ये बिघडली आहे. या सर्व ग्रामस्थांवर गावातच १४ विशेष वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तपासणी पथकाकडून उपचार सुरू आहेत. तीन जणांवर अकोल्यातील शासकीय रुग्णालय आणि अन्य तिघांना तेल्हाराच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.तेल्हारा तालुक्यातील बेलखेड येथे ग्रामपंचायतद्वारे कुपनलिकेद्वारे पाणीपुरवठा केला जातो. दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामपंचायत प्रशासनासह आरोग्य विभागाने दुर्लक्ष केल्याने ग्रामस्थांचे आरोग्य बिघडले, असा संताप व्यक्त करण्यात आला.

ईव्हीएम, व्हीव्हीपॅट मशीन तलावात फेकल्या

बंगालमध्ये निवडणूक हिंसाचारात बॉम्बस्फोट

नवी दिल्ली

पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, बिहारसह देशातील आठ राज्यांमधील एकूण ५७ मतदारसंघांमध्ये शनिवारी लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अखेरच्या टप्प्यातील मतदानाची प्रक्रिया चालू आहे. मतदानादरम्यान, पश्चिम बंगालमध्ये आज पुन्हा एकदा हिंसाचार झाल्याचं पाहायला मिळालं आहे. पश्चिम बंगालमधील दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील कुलतली भागात ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीन तलावात फेकून दिल्याची घटना समोर आली आहे. संतप्त जमावाने येथील एका मतदान केंद्रावर हल्ला करून येथील

ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीन हिसकावल्या आणि पाण्यात फेकून दिल्या आहेत. कुलतली यथील बूथ क्रमांक ४० आणि बूथ क्रमांक ४१ वर ही घटना घडली आहे.

दरम्यान, पोलेरहाट भागातही हिंसाचार झाला आहे. या हिंसाचारात आयएसएफ आणि सीपीआयएमचे कार्यकर्ते जखमी झाले आहेत. आयएसएफ आणि सीपीआयएमच्या समर्थकांनी दावा केला आहे की, त्यांच्यावर तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केला होता. दरम्यान, या भागातील हिंसाचार रोखण्यासाठी पोलिसांची मोठी तुकडी पोलेरहाटमध्ये दाखल झाली आहे.

कुलतली आणि पोलेरहाटमधील हिंसाचाराच्या घटनेचे व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहेत. या व्हिडीओंमध्ये दिसतंय की, पोलीस जमावाच्या मागे धावत आहेत. हिंसाचार रोखण्यासाठी पोलिसांनी सौम्य लाठीहल्ला केला. पोलिसांनी लाठीहल्ला सुरू करताच जमाव चारही दिशांना पांगला. पोलिसांच्या भीतीने काही कार्यकर्त्यांनी तलावात उड्या मारल्या. दक्षिण २४ परगणा जिल्ह्यासह संदेशखाली आणि भांगर भागातूनही हिंसाचाराच्या बातम्या समोर येत आहेत. बशीरहाट लोकसभा मतदारसंघातील संदेशखाली येथे शुक्रवारी रात्रीपासून हिंसाचार सुरू झाला आहे. आज सकाळी सात वाजता मतदान सुरू झालं, तेव्हादेखील या भागात हिंसाचार चालू होता. हा हिंसाचार रोखण्यासाठी, मतदारसंघात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी या भागात पोलिसांच्या अधिक तुकड्यांना पाचारण करण्यात आलं असून मागील काही तासांपासून येथील परिस्थिती पोलिसांच्या नियंत्रणात आहे. दरम्यान, शुक्रवारी रात्री या परिसरातील महिलांनी काठी आणि झाडू हाती घेऊन मोर्चा काढला होता.

देशी बॉम्बच्या सहाय्याने हल्ला

संदेशखाली भागात झालेल्या हिंसाचाराबाबत माहिती देताना पोलीस म्हणाले, भाजपाच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी काही स्वयंसेवकांना मारहाण केली होती. तेव्हापासून या हिंसेला सुरुवात झाली. तर भाजपाच्या महिला कार्यकर्त्यांनी आरोप केला आहे की, तृणमूल काँग्रेसचे नेते पोलिसांच्या मदतीने त्यांना धमक्या देत आहेत. तसेच हा सगळा हिंसाचार तुरुंगात कैद असलेले तृणमूल काँग्रेसचे नेते शेख शाहजहाँ यांच्या गुंडांनी घडवून आणल्याचा आरोपही या महिलांनी केला आहे. दरम्यान, मतदानावेळी जाधवपूरमध्ये देशी बॉम्बच्या सहाय्याने हल्ला झाल्याचं वृत्त समोर आलं आहे.

२९५+ जागा जिंकण्याचा विश्वास

इंडिया आघाडीच्या नेत्यांनी जनतेचा 'एक्झिट पोल' सांगितला

नवी दिल्ली

लोकसभा निवडणुकीसाठी सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातील मतदान आज पार पडले. मतदान पार पडण्यापूर्वीच इंडिया आघाडीच्या बैठकीनंतर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, भारत आघाडी किमान २९५ जागा जिंकेल. इंडिया आघाडीला हहुमत मिळेल, आमच्याकडे सार्वजनिक सर्वेक्षण असल्याचे ते म्हणाले.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या निवासस्थानी विरोधकांच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीची बैठक झाली. लोकसभा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यातील मतदानाच्या दिवशी ही बैठक झाली. लोकसभा निवडणुकीची मतमोजणी ४ जून रोजी होणार आहे. टीएमसी प्रमुख आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या बैठकीला हजर राहिल्या नाहीत. पीडीपीच्या प्रमुख मेहबुबा मुफ्तीही या बैठकीला हजर राहिल्या नाहीत.

इंडिया आघाडीच्या बैठकीला कोण उपस्थित?

या बैठकीला काँग्रेस, समाजवादी पक्ष, सीपीआय(एम), सीपीआय, डीएमके, जेएमएम, आप, आरजेडी, शिवसेना (यूबीटी) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) यांचे नेते उपस्थित होते. या बैठकीत काँग्रेसच्या संसदीय अध्यक्षा सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियांका गांधी, केसी वेणुगोपाल, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड, सपा प्रमुख अखिलेश यादव, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, आप नेते राघव चड्ढा, संजय सिंह यांचा समावेश होता.

काँग्रेसची पोस्ट काय?

जनतेचा एक्झिट पोल असं नाव देत काँग्रेसने त्यांची संख्या जाहीर केली आहे. अन्यायावर न्यायाचा विजय होईल असाही दावा काँग्रेसने केला आहे. २९५ पेक्षा अधिक जागा इंडिया आघाडीला मिळतील असं काँग्रेसने म्हटलं आहे. तसंच एक उत्तम चित्रही त्या ट्वीटसह पोस्ट केलं आहे.

पवन खेडा म्हणाले की, इंडिया अलायन्सच्या बैठकीत एक्झिट पोलशी संबंधित भाजप आणि त्यांच्या यंत्रणांचा पर्दाफाश करण्याचा निर्णय घेण्यात आला. एक्झिट पोलच्या चर्चेत भाग घेण्याच्या बाजूने आणि विरोधात असलेल्या सर्व पैलूंवर चर्चा केल्यानंतर, भारत आघाडीचे सर्व सदस्य पक्ष एक्झिट पोलच्या चर्चेत सहभागी होतील असा एकमताने निर्णय घेण्यात आला आहे. शुक्रवारी, काँग्रेस पक्षाने म्हटले होते की ते टीआरपी खेळात अडकू इच्छित नाहीत.

केजरीवालांना आत्मसमर्पण करावं लागणार

न्यायालयाकडून दिलासा नाहीच

नवी दिल्ली

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मद्य धोरण प्रकरणामध्ये ईडीकडून अटक झाल्यानंतर लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी सर्वोच्च न्यायालयाने २१ दिवसांचा अंतरिम जामीन मंजूर केला होता. यानंतर आता २१ दिवसांच्या जामीनाची मुदत आज म्हणजे १ जून रोजी संपत आहे. त्यामुळे २ जून रोजी अरविंद केजरीवाल यांना तिहार तुरुंगात आत्मसमर्पण करावं लागणार आहे.

दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयात वैद्यकीय कारणास्तव जामीन मिळण्याच्या याचिकेवर शनिवारी सुनावणी झाली. या याचिकेवरील निर्णय राऊस अव्हेन्यू न्यायालयाने ५ जूनपर्यंत निर्णय राखून ठेवला आहे. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या वैद्यकीय चाचणीसाठी ७ दिवसांचा जामीन मागितला होता. मात्र, या जामीनाला अंमलबजावणी संचालनालयाने न्यायालयात विरोध केला. तसंच अरविंद केजरीवाल यांच्या आरोग्याबाबत त्यांच्याकडून खोटी विधाने करण्यात येत असल्याचा आरोप करत केजरीवालांनी तथ्ये लपवल्याचं ईडीने म्हटलं. याचिका सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला मुदतवाढ देण्यासाठी नसून वैद्यकीय जामिनासाठी आहे, असं केजरीवाल यांच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितलं. यानंतर या याचिकेवरील निर्णय राऊस अव्हेन्यू न्यायालयाने ५ जूनपर्यंत निर्णय राखून ठेवला.

सर्व राज्यात जाऊन केला प्रचार

मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी प्रकृतीच्या कारणास्तव मागितलेल्या अंतरिम जामिनाला ईडीने विरोध करताना ईडीने सांगितलं की, अरविंद केजरीवाल यांनी सर्व राज्यांमध्ये प्रचार केला. त्यांची वैद्यकीय चाचणी झाली नाही. आता आत्मसमर्पणाच्या वेळी ते वैद्यकीय कारणास्तव अंतरिम जामीन मागत आहे. केजरीवाल चाचणीला विलंब करून न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. तसंच त्यांनी ७ किलोने वजन कमी झाल्याचा खोटा दावा केला असल्याचंही ईडीने म्हटलं.

व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात घट

मुंबई : सध्या सोनं चांदीचे दर गगनाला भिडत असताना अशातच ग्राहकांना एक दिलासादायक माहिती समोर आली आहे. जून महिन्याला सुरुवात झाली असून आजपासून वाहतुकीच्या अनेक नियमांत बदल झाले आहेत. त्यासोबत गॅस सिलेंडरच्या दरातही घट केली असल्याची आनंदाची माहिती मिळाली आहे.

देशातील ऑईल कंपन्यांनी सलग तिसऱ्यांना व्यावसायिक गॅस सिलिंडरचे दर कमी केले आहेत. गेल्या तीन महिन्यांत चार महानगरातील व्यावसायिक गॅस सिलिंडर ११९ ते १२४ रुपयांनी स्वस्त झाले आहेत. तर जून महिन्यात व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात ७० ते ७२ रुपयांनी घट झाली आहे. वसायिक गॅस सिलिंडर इतक्या रुपयांनी स्वस्त आयओसीएलच्या माहितीनुसार, देशातील चार महानगरांत व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात घट करण्यात आली आहे.

दोन दिवसात उष्णतेची लाट कमी होणार

पुणे/प्रतिनिधी

ईशान्य भारतात सुरु झालेल्या अतिवृष्टीचा परिणाम म्हणून उत्तर भारतासह महाराष्ट्रातील उष्णतेची तीव्र लाट पुढील दोन दिवसांत कमी होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने दिला.

नैऋत्य मोसमी वारे केरळात अडखळले

शनिवारी नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी बंगालचा उपसागर, अरबी समुद्र आणि ईशान्य भारतात आगेकूच केली. मात्र, केरळमध्ये हे वारे दोन दिवसांपासून अडखळले आहेत.

नैऋत्य मोसमी वारे ईशान्य बंगालच्या उपसागराच्या उर्वरित भागांमध्ये आणि वायव्य बंगाल उपसागराच्या काही भागांमध्ये, त्रिपुरा, मेघालय आणि आसामच्या उर्वरित भागांमध्ये आणि उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या बहुतांश भागांमध्ये पुढे सरकले आहेत. मोसमी वारे मध्य अरबी समुद्राच्या आणखी भागात, दक्षिण अरबी समुद्राचा उर्वरित भाग, लक्षद्वीप क्षेत्र आणि केरळ, कर्नाटकचा काही भाग, तमिळनाडूचा आणखी भाग आणि नैऋत्य बंगालच्या उपसागरात पुढील दोन-तीन दिवसांत पुढे जाण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे.

मतमोजणीच्या दिवशी पावसाची शक्यता

लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या दिवशी (४ जून) कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे.

हवाई प्रवास आता आणखी स्वस्त होणार

मुंबई : जून महिना सुरु होताच अनेक नियमांत बदल करण्यात आले आहेत. अशातच हवाई प्रवाशांसाठीही एक आनंदाची माहिती समोर येत आहे. गॅस सिलेंडरप्रमाणे आता लवकरच हवाई प्रवास देखील स्वस्त होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तेल कंपन्यांनी जेट इंधन म्हणजेच एअर टर्बाइन इंधनच्या किमतीत कमालीची घट केल्याचे दिसून येत आहे. देशांतर्गत मार्गांवर विमान उड्डाण करण्यासाठी वापरण्यात येणारे हे तेल तब्बल १ लाख रुपयांच्या खाली आले आहे. इतकेच नव्हे तर देशातील चार महानगरांमध्ये आंतरराष्ट्रीय मार्गांवर उड्डाण करणाऱ्या विमानांच्या इंधन दरातही मोठी कपात करण्यात आली आहे.

सरकारी नोकरीमध्ये पदोन्नती मिळणे हा अधिकार नाही

नवी दिल्ली

सरकारी नोकरदारांना पदोन्नती देण्यासंदर्भात राज्यघटनेत कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे नोकरदारांना पदोन्नती देण्याचे निकष, स्वरूप आणि त्यासाठी काय पात्रता असावी, हे ठरविण्यासाठी कायदेमंडळ आणि मंत्रिमंडळ स्वतंत्र आहे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. न्या. जेबी पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांचा समावेश असलेल्या सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने सदर निकाल दिला आहे. भारतातील कोणताही सरकारी कर्मचारी पदोन्नती हा त्याचा अधिकार असल्याचे सांगू शकत नाही, कारण संविधानात पदोन्नतीबाबत कोणताही उल्लेख नाही.

सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

खंडपीठाने पुढे म्हटले की, कायदेमंडळ किंवा मंत्रिमंडळ पदोन्नतीच्या जागा भरण्यासाठी निकष आणि त्यासंबंधीची प्रक्रिया ठरवू शकतात. नोकरीचे स्वरुप आणि उमेदवाराचे काम यावर पदोन्नतीच्या पदांवर रिक्त जागा भरण्यासाठीची नियमावली केली जाऊ शकते. तसेच पदोन्नतीसाठी स्वीकारलेले धोरण हे सक्षम उमेदवारासाठी योग्य आहे किंवा नाही, याचे पुनरावलोकन न्यायालय करू शकत नाही.गुजरातमधील जिल्हा न्यायाधीशांचा निवडीवरून पदोन्नतीचा वाद सुरू झाला. हा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचला असताना खंडपीठाने यावर टिप्पणी केली.

यंदाच्या लोकसभा निवडणुकीवर १.३५ लाख कोटींचा खर्च?

मुंबई/प्रतिनिधी

देशातील १८ वी लोकसभा सात टप्प्यात पार पडत आहे. लोकसभा निवडणूक २०२४च्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातील मतदान शनिवारी पार पडले. या मतदानानंतर संध्याकाळी ६ वाजल्यापासून एक्झिट पोल समोर येणार आहेत. देशात इंडिया विरुद्ध एनडीए अशी लढत होत आहे. या लढतीत कोणाचा विजय होणार हे ४ जून रोजी स्पष्ट होणार आहे. मात्र, त्यापूर्वी यंदाच्या लोकसभा निवडणुकीवर किती खर्च झाला, याबाबतची आकडेवारी समोर आली आहे. त्यानुसार, तब्बल १.३५ लाख कोटी रुपये खर्च झाल्याची माहिती समोर येत आहे.

सेंटर फॉर मीडिया स्टडीजच्या अंदाजानुसार, यंदा लोकसभा निवडणुकीचा खर्च १.३५ लाख कोटी रुपयांवर पोहोचण्याची शक्यता आहे. भाजपसह काँग्रेस, समाजवादी पार्टी आणि अन्य प्रमुख पक्षांनी यंदा लोकसभा निवडणुकीवर मजबूत खर्च केला आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत यंदाच्या निवडणुकीत जवळपास दुप्पट खर्च झाल्याचा अंदाज सेंटर फॉर मीडिया स्टडीजने वर्तवला आहे.

यंदाच्या निवडणुकीचा खर्च हा अमेरिकेतील

२०२० च्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या खर्चाला मागे टाकणारा आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीवर त्यावेळी १.२० लाख कोटी रुपये खर्च झाले होते. मात्र देशातील यंदाच्या लोकसभा निवडणुकीचा खर्च १.३५ लाख कोटी रुपयांवर पोहोचण्याचा अंदाज वर्तवला जातो आहे. परिणामी यंदाची निवडणूक सर्वाधिक खर्चिक ठरली आहे. निवडणूक खर्चात वाढ झाल्याने यंदा एका मताची किंमत जवळपास १४०० असल्याचाही अंदाज वर्तवला जात आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाने प्रत्येक उमेदवाराला निवडणूक खर्चाची सीमारेषा आखून दिलेली आहे. लोकसभा निवडणुकीत प्रत्येक उमेदवार ९५ लाख रुपयांपर्यंत खर्च करण्याची मुभा निवडणूक आयोगाने दिली आहे. तसेच, विधानसभा निवडणुकीत खर्चाची सीमारेषा २८ लाख ते ४० लाख आहे. त्याचप्रमाणे, अरुणाचल प्रदेशमध्ये लोकसभा निवडणुकीत उमेदवार ७५ लाख, तर विधानसभा निवडणुकीत २८ लाख खर्च करू शकतो. दरम्यान, निडवणुक खर्चात पारदर्शकता यावी यासाठी राजकीय पक्षांना निवडणूक आयोगाला प्रत्येक वर्षी खर्चाची माहिती देणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच निवडणूक निधीची माहिती देणे बंधनकारक आहे. यासह निवडणूक संपताच पुढील ७५ दिवसात खर्चाचा तपशीलही द्यावा लागतो. त्यानंतर ही माहिती निवडणूक आयोगाकडून आपल्या अधिकृत वेबसाईटवर जारी केली जाते.

केरळमध्ये बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव वाढला

नवी दिल्ली : देशात अनेक ठिकाणी एव्हियन इन्फ्लूएन्झा विषाणूने बाधित झालेले रुग्ण आढळल्यामुळे केंद्र सरकारने शुक्रवारी सर्व राज्य सरकारांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. एव्हियन इन्फ्लूएन्झाला बर्ड फ्लू देखील म्हटलं जातं. कुठेही पक्षी आणि कोंबड्यांचा असामान्य मृत्यू झाल्यास त्या प्रकरणी लक्ष घाला, सावध राहा आणि यासंबंधीची माहिती ताबडतोब पशुसंवर्धन विभागाला कळवा, असं केंद्र सरकारने राज्य सरकारांना पाठवलेल्या आदेशात म्हटलं आहे. केंद्र सरकारने सर्व राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.